स्थायी समितीच्या शनिवार दिनांक 17–02–2018 रोजी सायंकाळी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 2. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 499ः–
{जलप्रदाय विभाग}

पेंच टप्पा–४ योजने अंतर्गत RPTS रोड वरील १००० मी.मी. व्यासाची M.S Pipeline ही पादचारी मार्गावरुन जात असल्याने पादचारी मार्गात अडचण निर्माण होत असल्याने ती Pushing Technology द्वारा नाल्याचे खालुन टाकण्याचे प्रस्तावित आहे व त्याकरिता मे. डी. आर. ए. कंन्सल्टंट प्रा लि. यांनी सादर केलेल्या Rs. 1,02,59,991/- रक्कमेच्या विस्तृत प्राकलनास व आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा व मे. डी. आर. ए. कंन्सल्टंट लिमिटेड यांना म.न.पा. चे प्रचलित धोरणानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषय कार्यालयास परत करण्यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 500:— स्थायी समिती ठराव क्र. 233 दि. 18.03.2016 नुसार सन
{सा.प्र.वि.} 2015—16 व 2016—17 या दोन वर्षाकरिता भाडेतत्वावरील चार चाकी वाहनांसाठी निविदा प्रक्रिया बोलविण्यात आलेली होती. त्या निविदेची मुदत दि. 28. 02.2018 रोजी संपुष्टात येत असून मा. आयुक्त यांचे दि. 16.12.2017 चे मंजुरीनुसार महानगरपालिकेतील विविध पदाधिकारी, झोन सभापती, विभागप्रमुख, सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी तसेच यांना कार्यालयीन कामकारिता चारचाकी वाहन वापरण्यासाठी सन 2018—20 या दोन वर्षाकरिता नवीन निविदा प्रक्रिया (Gem-government e Market Portal वर) करणेबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच,.

1) नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होतपर्यंत निविदेला मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मंजूर करणेबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2) प्र.ले.वि.अ. यांचेकडुन प्राप्त परिपत्रक क्र. 1234/प्रलेविअ/2017, दि. 25.09.2017 नुसार कार्यालयीन खरेदी कार्यपद्धतीसाठी व राज्य शासनाने स्विकृत केलेल्या गव्हर्नमेंट ई—मार्केटप्लस (Gem) पोर्टलची कार्यपद्धती महानगरपालिकेत वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करण्याबाबत निर्देशानुसार (Gem) पोर्टलवर चारचाकी वाहन सुद्धा भाडयाने घ्यावयाचे असल्यास Bid मागविण्याची सोय उपलब्ध असल्याने Gem पोर्टवरुन Bid मागवून कार्यालयीन चारचाकी वाहन भाडयाने घेणेबाबतचा प्रश्न तसेच या कामास वार्षिक खर्च अंदाजे रु. 200.00 (दोनशे लक्ष) ची ई—निविदा (Gem पोर्टलद्वारे) मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, निविदा अटी शर्ती प्रपत्रात मध्ये 1 जानेवारी 2014 नंतर चारचाकी वाहनांचा समावेश करावा. यापूर्वीची अट रद्द करण्यात येते. तसेच जी चारचाकी वाहन जर नवीन असेल त्या वाहनास प्राथमिकता व प्राथाम्य देण्यात यावे. आणखी असे की हया संपूर्ण निविदा खुल्या निविदा प्रक्रियेने कराव्या, नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होतपर्यंत जुन्या निविदेस मुदतवाढ देण्यात येते. यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 501:— केंन्द्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार दि. ०५ जून
{आरोग्य विभाग} २०१७ रोजी म्हणजे 'जागतिक पर्यावरण' दिनाचे औचित्य साधून ओला—सुका वर्गीकृत कचरा ठेवण्यासाठी अनुक्रमे हिरव्या व निळया रंगाच्या डस्टबीन खरेदी करण्याबाबत दि. ०८/०५/२०१७ च्या सर्वसाधारण सभेत ठराव कं. २६ पारीत करण्यात आलेला आहे.

या खरेदीची एकूण अंदाजे राशी रु. १३.५० कोटी खर्चास स्थायी समिती ठराव कं. ९७ दि. ०७/०७/२०१७ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. व यास मा. आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

नागपूर महानगरपालिका हद्दीत ५.५ लक्ष घरे असून प्र.ले.वि.अ. यांनी मंजूर केल्याप्रमाणे ३० टक्के घरांना म्हणजे १,६५,००० घरांना प्रति जोडी नूसार देण्यात येणा—या बीन्स् बाबत निविदा प्रक्रीया पार पाडण्यात आलेली आहे. निविदेमध्ये में. प्रायमा प्लॉस्टीक लिमिटेड, मुंबई यांचे सर्वात निम्मतम दर प्राप्त झालेले असून प्रति नग रु. ५६.५९ + GST यानूसार दर रु. ६६.७८ प्रति डस्टबिन याप्रमाणे एकूण ३,३०,००० नग बीन्स् खरेदीवर एकूण रु. २,२०,३६,१४६/— खर्च अपेक्षित आहे.

खर्च आरोग्य विभागाच्या व्यय पद कं. A24001220302 या अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन, P.I.L. No. 74/2014 च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे आदेश दि. 24.01.2018 चे विभागाने काटेकोर पालन करावे, ओला—सुका कचरा वर्गीकृत करण्यासाठी ज्या बीन्स प्रस्तावित केल्या आहे. त्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात विक्रीकरिता ठेवण्यासाठी प्रशासनाने योग्य व्यवस्थापन करावे आणखी असे की, या निवेदेमध्ये जे निविदाकार तांत्रिकदृष्टया विभागाने पात्र ठरविले आहे. त्या सर्व निविदाकारास L1 च्या निम्नतम दरात काम करावयाचे किंवा पुरवठा करण्यास तयार असल्यास त्यांना रितसर कळविण्यात यावे. पुरवठा करण्यास तयार असलेल्या निविदाकारास हे काम समप्रमाणात वाटुन

द्यावे. कोणत्याही परिस्थितीत हया बीन्स निःशुल्क देण्यात येऊ नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 502ः— प्रभाग क्र. 27 अ अंतर्गत नंदनवन झोपडपटटी येथील श्री
{लोककर्म झोन 05} ढोके ते श्री लारोकर यांचे घरापर्यंत सी.सी. रोडचे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. विनोद मोहन मडावी यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 28,98,886/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 503ः— प्रभाग 24 (ब), डिप्टी सिग्नल कुंभार मोहल्ला येथे सिमेंट
{लोककर्म झोन 08} काँक्रीट पेव्हमेंट चे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. एस.के. इंटरप्राईजेस यांची प्राकलनीय दरापेक्षा 7.11 टक्के कमी दराची रु. 33,66,945/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 504ः— प्रभाग क्र. १५ रिझर्व बॅक चौकातील डॉ. बाबासाहेब
{लोककर्म झोन 02} आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ संविधान स्मारकाचे बांधकामास्तव रू. २९,७८,१३१/— (एकोणतीस लक्ष अठ्ठयात्तर हजार एकशे एकतीस रूपये फक्त ) रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून करण्याचा तसेच या कामास्तव म. न. पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. EN Vastu श्री. उदयदत्त गजभिये यांची मनपाच्या मंजुर दरावर नेमणुक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 505ः— प्रभाग क्र. २७ ब अंतर्गत गुरूदेव नगर व बापू नगर,
{लोककर्म झोन 05} कबीर नगर येथील रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. अमृता कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३८,००,८४२/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 506ः— प्रभाग क्र. 23 क दत्तनगर येथे श्री जूनेजा ते श्री जैन यांचे
{लोककर्म झोन 08} घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. उल्हास इंटरप्रायजेस यांची प्राकलनीय दरा पेक्षा 15.83 टक्के कमी दराची रु. 23,99,926/— (अक्षरी तेविस लक्ष नव्व्यानव हजार नऊशे सव्विस रुपये ) राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच वर्ष २०१५ ते २०१७ पर्यंत या निविदाकाराने जी कामे घेतली आहे. त्या कामाच्या गुणवत्तेची संपूर्ण चौकशी श्री. बनगिरवार, जेष्ठ तांत्रिक सल्लागार यांनी करुन संपूर्ण अहवाल स्थायी समितीच्या पटलावर एक महिन्यात ठेवावा यास स्थायी समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 507ः— जुना प्रभाग क्र. 32 (अ) मधील संतरंजीपूरा स्लम येथील
{लोककर्म झोन 7} तेलंगीपूरा, मुसलमानपूरा व नवा बगडगंज बुध्दपूरा येथे विविध ठिकाणी भुमीगत पाईप लाईन टाकण्याबाबत कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. संतोष आर. खरपकर यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 44,66,904/— पेक्षा 7.79 जास्त दराची

रू. 48,14,875/– (रूपये अठठेचाळीस लक्ष चौवदा हजार आठशे पंच्यात्तर) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 508ः– {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 37 (अ), परसोडी (गोपालनगर) येथील त्रिशरन बौध्द विहार प्रस्तावित उद्यानात विविध स्थापत्य कामा करिता रू 29,21,983/– रकमेस वास्तुविशारद च्या मानधनासह स्थायी समिती ठराव क्र. 246/दि. 16/11/2016 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने स्थापत्य कामांच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. बाबा एन्टरप्राईजेस यांची 15.38% कमी दराची राशी रू. 23,80,687/–च्या निम्मतम निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 509ः– {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २६ अ अंतर्गत पडोले नगर येथील नाल्याला आर.सी.सी. भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई–निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकाराची निविदांपैकी मे. राजेश रंगारी यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 35,28,797/– रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 510ः– {शिक्षण विभाग} नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थी आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांतील विद्यार्थी शाळेत प्रवेश घेणारे असल्याने या विद्यार्थ्यांचे पालक मोलमजुरी करुन आपल्या पाल्यांना शिक्षणापेक्षा कुटंबाला आर्थिक हातभार लावायला जास्त मदत देतात. त्यामुळे या घटकातील पालकांना शिक्षणाबद्दल अनास्था व अज्ञान दिसून येते. अशा घटकातील विद्यार्थ्यांना, शिक्षणाचा मुख्य प्रवाहा आणण्यासाठी शासनाद्वारे शालेय पोषण आहार योजना विद्यार्थ्यांसाठी सुरु करुन यासाठी शासकीय अनुदानातुन महिला बचत गटामार्फत खिचडी शिजवुन विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येते. परंतु दररोज खिचडी खाण्यावर विद्यार्थ्यांचा विशेष भर नसतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन ज्यात त्याला घरी मिळत असलेले नित्याचे भोजन म्हणजेच वरण, भात, पोळी, भाजी, कोशिंबीर दिल्यास विद्यार्थी जेवण घेऊन शिक्षणामध्ये रुची दाखवू शकेल. तसेच उपस्थितीच्या प्रमाणात वाढ होऊन विद्यार्थ्यांची गळती कमी होण्यास मदत होईल. यावर म.न.पा.ने सन 2008–09 पासून मध्यान आहार (शालेय पोषण आहार) योजना सुरु केलेली असून या विद्यार्थ्यांकरिता दुपार जेवण तयार करण्याचे कार्य महिला बचत गटामार्फत शाळास्तरावर करण्यात येत असते. या कामाच्या मेहनता करीता शासन अनुदान प्राप्त होत असून मनपा अंदाजपत्रकातही तशी तरतूद उपलब्ध करण्यात येत असते.

सदर योजने अंतर्गत केंद्र शासन 60% व राज्य शासन 40% वर्ग 1 ते 5 ला प्रति विद्यार्थी प्रति दिवस रु. 4.13/– वर्ग 6 ते 8 करीता रु. 6.18/– याप्रमाणे जिल्हा परिषद मार्फत अनुदान प्राप्त होते. तसेच सन 2008–2009 या सत्रापासुन म.न.पा. द्वारा प्रति विद्यार्थी प्रति दिवस रु. 2/– , रु. 2.50/– या प्रमाणे वर्ग 1 ते 8 मधील पटसंख्या 17798 वार्षिक खर्च 86,30,511/– इतका अपेक्षित आहे.

शालेय पोषण आहार देयकाचे दरवर्षी होणारे भुगतानाला व अंदाजपत्रकीय आयव्ययकात पद क्र. 456 (A25802041004) तरतूद 1,00,00,000/– उपलब्ध राशील शालेय पोषण आहार योजना दीर्घकाळ चालणारी योजना असल्याने ही योजना अंमलात असेपर्यंत किंवा म.न.पा.चे निकष बदले पर्यंत या योजनेकरिता आर्थिक खर्च मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 511ः– {समाजकल्याण विभाग} स्थायी समिती ठराव क्र. 194, दिनांक 27/10/2017 मधील अटी व शर्तीनुसार ''अंत्योदय योजना'' अंतर्गत दिव्यागांना ई–रिक्षा वाटप करण्याकरिता विभागामार्फत पात्र ठरविण्यात आलेल्या 70 लाभार्थ्यांची यादी

स्थायी समितीसमोर माहितीकरिता ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 512:— प्रभाग 24 (ब), डिप्टी सिग्नल साखरकरवाडी येथे साखरकर
{लोककर्म झोन 08} यांचे घरापासुन सुपर फ्लोर मिल आणि डॉ. नियाझी ते मदरसा येथील सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. जगदिशप्रसाद तिवारी यांची प्राकलनीय दरापेक्षा 12.90 टक्के कमी दराची रु. 23,44,333/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 513:— प्रभाग क्र. 37 'क' अंतर्गत आनंद नगर व उरूवेला कॉलोनी
{स्लम विभाग} व इतर ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 29,99,957/— (रूपये एकोनतीस लक्ष, नव्यान्नव हजार नऊशे सत्तावन फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 514:— प्रभाग 24 (ब), साखरकरवाडी येथील मेनरोड
{लोककर्म झोन 08} ते संतगुरु घासीदास हॉल आणि ललवा पान दुकान ते सातपुते यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. अथर्व कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 14.72 टक्के कमी दराची रु. 34,10,975/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 515:— प्रभाग क्र. ३४ (क) मधील न्यु अमर नगर येथील
{लोककर्म झोन 03} रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ३९,९०,५७४/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलाविण्याचा अनुमतीस्तव प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 516:— दिनांक 20.11.2017 रोजी भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेत
{कर विभाग} मा. महापौरजी यांनी विषय पत्रिकेवरील मा. श्री प्रफुल्ल गुडधे, वरिष्ठ नगरसेवक, यांनी प्रश्न क्र. 48 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्दयावर स्थायी समितीने संबंधित विषयाची तपासणी करावी व फेर विचार करून पूढच्या सभागृहामध्ये हा विषय पून्हा पाठविण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत. सदरहू निर्देशान्वये संबंधित विषयाच्या अनुषंगाने माहिती सोबत टांचण आहे.

मा. महापौरांचे निर्देशान्वये संबंधित विषयाची तपासणी करणे व तपासणी अहवाल सभागृहामध्ये पुन्हा पाठविणेबाबतचा निर्णय घेणे बाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, विषयाच्या अनुषंगाने प्रकरणातील संबंधित विषयाची तपासणी करुन अहवाल सभागृहामध्ये ठेवण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 517:— 16,000 लि. क्षमता वाहून घेणारे 2 नग TATA LPT 3118
{अग्निशमन विभाग} BSIV with Automatic Transmission Chassis अग्रीमद्वारे खरेदी करण्याबाबत.

विभागासाठी 2 नग 16,000 लि. क्षमतेचे 2250 LPM Pump क्षमता असलेले Water Browser Fabrication कार्य करून घेण्याकरीता ई—निविदा मागविणे व 2 नग TATA LPT 3118 BSIII चेसीस Without Auto Transmission Special Govt. Price/DGS & D Rate Contract (कार्यादेश देतेवेळेस जे दर राहतील त्याप्रमाणे) M/s. TATA Motors Ltd., Mumbai यांचेतर्फे

अग्रीम काढून खरेदी करण्याचे मंजूर स्थायी समिती ठराव क्र. 731 दि. 18.11.2016 प्रमाणे मंजुर झाले.

Fabrication कार्याचे निविदा तांत्रिक स्पेशिफिकेशन तयार करतेवेळेस विभागाकडे 16,000 लि. क्षमतेचे Water Browser उपलब्ध नसल्याने सदर कार्याचे तांत्रिक स्पेशिफिकेशन तयार करण्याच्या संबंधाने अशा प्रकारचे भारी भरकम Water Browser उपलब्ध असलेल्या बृहन्मुंबई, ठाणे येथील अग्निशमन सेवेतील तांत्रिक अधिकारी यांच्यासोबत दुरध्वनीवर प्रमुख अग्निशमन अधिकारी यांचेद्वारे सविस्तर चर्चा करण्यात आली.

झालेल्या चर्चेप्रमाणे 16,000 लि. क्षमतेचे Water Browser Fabrication बांधणी Auto Transmission Chassis वर केल्यास जास्त उपयुक्त ठरेल कारण एखाद्या दुर्घटनेवर अशाप्रकारचे वाहनांना शहरातील गर्दीच्या रस्त्यावरून पाठवितेवेळेस वाहन चालकाला वारंवार वाहनाचे गियर बदलावे लागते. ज्यामुळे वाहनाची गती कमी झाल्यास मागून येणारे वाहने वाहनाच्या समोर निघून जातात त्यामुळे घटनास्थळी जाण्यास विलंब होतो.

अशाप्रकारच्या भारी भरकम क्षमता असलेल्या वाहनाच्या चेसीस मध्ये Auto Transmission व्यवस्था असल्यास वाहन चालकाला गर्दीच्या रस्त्यांवर वाहन चालवितेवेळेस जास्त अडथळा होत नसतो. याकरीता Auto Transmission व्यवस्था असलेले Chassis वर Water Browser बांधणीचे कार्य करून घेणे जास्त उपयुक्त होईल.

याकरीता विभागाने 2 नग 16000 लि. क्षमता वाहून घेणारे Auto Transmission Chassis चे M/s. TATA Motors Mumbai यांचे दर रू. 84,79,744 व M/s. MAN Trucks India Pvt. Ltd., Pune यांचे दर रू. 1,15,49,002 याप्रमाणे दरपत्रक प्राप्त करून घेतलेले आहेत.

करीता 16000 लि. क्षमतेचे Water Browser Fabrication कार्यास लागणारे आवश्यक 2 नग TATA LPT 3118 BS IV with Automatic Transmission Chassis, under Special Govt. Price नुसार (कार्यादेश देतेवेळेस दर वाढ/घट प्रमाण) M/s. TATA Motors Ltd., Mumbai यांचेकडून अग्रीमद्वारे खरेदी करून घेण्यास यापोटी येणाऱ्या रू. 84,79,744 खर्चाचा सुधारीत प्रश्न स्थायी समितीने एकमताने विचारात घेवून या विषयास मंजुर करून घेणे.

ठराव क्रमांक 518:— {लोककर्म झोन 2} प्रभाग क्र. १२ ड मधील जगदीशनगर, मकरधोकडा आणि सुरेंद्रगढ येथे संरक्षण भिंत बांधण्याच्या रू. २९,६५,८००/— च्या प्राकलनास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 519:— {लोककर्म झोन 03} प्रभाग क्र. २९ (क) अंतर्गत निलकमल नगर नरसाळा येथे सिमेंट कॉक्रिट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण पाच निविदारांपैकी मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा १७.०० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३४,४५,८९१/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 520:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २६ अ अंतर्गत संघर्ष नगर नाल्यालावर आर. सी.सी. भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. राजेश रंगारी यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 29,25,879/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 521:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 4 अ आणि ब मधील बिनाकी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. ख.क्र. 18/1 मौजा कळमना येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव प्राप्त निविदाकारा मे. आर.एम. गोपलानी यांची 10 टक्के कमी दराची 26,99,963/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 522:— स्थायी समिती ठराव क्रं. 108 दि. 14/08/2014 अन्वये
{आरोग्य विभाग} आरोग्य विभागाच्या निविदा झोन अंतर्गत येणा—या भुमिगत नाल्या (सिव्हर लाईन) वारंवार तूंबू नये म्हणुन त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना (Preventive Maintenance) करण्यासाठी हाय कॅपेसिटी सक्शन व जेटींग रिसाक्लींग यंत्रणेचे अधिकचे दोन संच 7 वर्षाकरीता भाडे तत्वावर घेण्याकरीता निविदा मागविल्या असता स्पर्धा होण्याच्या दृष्टीने चार वेळा निविदेला मुदत वाढ दिल्यानंतर एकच निविदा में. आर्यन पम्पस ॲन्ड अनव्हारो सोलुशन प्रा.लि. (ARYAN PUMPS AND ENVIRO SOLUTIONS PVT.LTD) यांची निविदा प्राप्त झाली होती त्यामध्ये प्रति दिवस प्रति पाळी रु. 56,000/— प्रमाणे दर महिन्यात 20 पाळीत काम करण्यास दोन मशिनकरीता वार्षीक खर्च रु. 2,68,80,000/— अपेक्षीत असून 7 वर्षाकरीता यावर रु. 18,81,60,000/— अधिक डब्ल्यु.पी.आय (WPI) प्रमाणे वाढ देण्यास दि. 23/02/2015 स्थायी समितीने मान्यता प्रदान केली असून अतिकालीक भत्ता (Over time) देय राहणार नाही असे मा. स्थायी समितीच्या ठरावात नमूद आहे. WPI दरा ऐवजी फिक्स 4% प्रतिवर्ष वाढ मा.प्र.ले.वि.अ. यांनी सुचविले आहे. हि बाब एजन्सीला मान्य आहे. याबाबत एजन्सीने निवेदन लेखी दि. 06/06/2017 नुसार विभागास सादर केले आहे.

WPI दराचे मागील 5 महिन्यांचे विश्लेषन केले असता WPI दर प्रलेविअ यांनी प्रस्तावित केलेल्या 4% दरापेक्षा जास्तच आढळून आलेला आहे त्यामुळे मुळ बिड प्रतिवर्षी 10% पेक्षा 4% वाढ ही मनपाची आर्थीक बचत करणारी आहे.

मुळ स्थायी समिती मान्यता WPI ला आहे त्याऐवजी 4% वाढ प्रतिवर्ष देण्याचे प्रस्तावित असून या अंतर्गत होणारा खर्च आयव्यव पद क्रं. A4301171602 मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 523:— प्रभाग क्र. 25—ड, श्री. लांजेवार ते शेलोकर यांचे घरापर्यंत
{लोककर्म झोन 08} बालाजीनगर पारडी येथे सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदाकार मे. उल्हास इंटरप्राइजेस यांची 15.86 टक्के कमी दराची रु. 24,99,673/— रकमेची निम्मतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 524:— प्रभाग क्र. ११ क अंतर्गत मानकापुर घाट येथे बर्नींग शेड,
{लोककर्म झोन 10} आय ब्लॉक व पावसाळी नालीचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ३ प्राप्त निविदापैकी मे. बी. डी. काळे यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १२.७०% कमी दराची राशी रू. ३०,२०,११५/— ( तीस लक्ष वीस हजार एकशे पंदरा रूपये फक्त ) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 525:— प्रभाग क्र. १३ हजारीपहाड येथील बस स्टॉप ते {लोककर्म
झोन 02} श्री. नगरारे यांचे घरापर्यंच्या रस्त्याचे रुंदीकरणाच्या व डांबरीकरणाच्या कामाचे एकुण ०४ (चार) निविदाकारापैकी मे. एस.के. जी. असोशिएट्स यांची मुळ प्राकलनापेक्षा ६.०३ टक्के ने कमी म्हणजे रु. ३०,४१,९२४.०० ची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 526 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती,
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर